# प्रेसनोट दि. ०४/०९/२०२१

## तळेगाव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीतील वराळे येथील खुनाचे गुन्ह्यातील आरोपीस अवघ्या १२ तासाचे आत अटक.
## गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड ची उल्लेखनीय कामगीरी

**दि.०२/०९/२०२१ रोजी वराळे फाटा एच.पी.गॅस प्लॅन्ट समोर देविदास मराठे यांचे भाड्याचे खोलीत अशोक कुमार या इसमाचा खुन झाला होता.** सदरबाबत तळेगाव एम.आ.डी.सी. पोलीस स्टेशन गु.र.नं. १३१/२०२१ भा.दं.वि.क. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. सदर घटनेची माहीती मिळताच मा.श्री.सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सहा पोलीस आयुक्त गुन्हे – १ यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणने बाबत सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळी, पो.हवा. ४३ सांळुके, पोहवा ७१८ बनसुडे, पो.ना. ८५८ राठोड, पोना. १००९ ठाकरे, पो.ना. १६०८ मालुसरे, पो.शि. ४९९ माने, पो.शि. १३०५ खेडकर, पो.शि. १८९८ गाडेकर, पो.शि. २५७१ गुट्टे यांचे आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे दोन पथके तयार करून घटनास्थळाचे आजुबाजुचे सि.सि.टी.व्ही. फुटेज चेक करुन तसेच पिंपरी, चिंचवड, देहुगाव, तळेगाव व पुणे स्टेशन या भागात रवाना केल्या असता **पोउपनि राहुल कोळी व पो.शि. ४९९ माने यांना बातमी मिळाली की**, एक इसम हा ससुन हॉस्पीटल जवळ संशयितरित्या फिरत आहे. सदर ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेतले व त्याच्याकडे सखोल तपास केला असता त्याने त्याचे नाव **पिंटु रामतेणु मंडल वय.२० वर्षे रा. रामनगर, पोलीस स्टेशन- कालीयाचेक जिल्हा- मालदा, राज्य- पश्चिम बंगाल** असे सांगुन **त्याने त्याचा मित्र नामे अशोककुमार वय. ३५ वर्षे रा. कर्नाटक याचा दारु पिवून झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन दारूच्या नशेत कांदा कापण्याचे सुरीने गळा चिरून खुन केल्याचे सांगीतले**. आरोपी पिंटु रामतेणु मंडल व मयत अशोककुमार हे दोघे केटरींग कामगार होते. सदर गुन्हयातील आज्ञात आरोपीची व मयताची कुठल्याही प्रकारची माहीती नसतांना अज्ञात आरोपी नामे पिंटु रामतेणु मंडल वय.२० वर्षे रा. रामनगर पोलीस स्टेशन कालीयाचेक जि. मालदा, राज्य - पश्चिम बंगाल याला गुन्हा घडल्यापासून **अवघ्या १२ तासाच्या आत पकडण्यात गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड यांना यश आले आहे. यातील मयत इसमाचे नाव अशोककुमार रा. कर्नाटक असुन त्याची अद्याप ओळख पटलेली नाही.**

सदरची कारवाई पोलीस आयुक्त मा. श्री कृष्णप्रकाश , अप्पर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त मुख्यालय, मा.श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे- 1 मा.श्री.डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद गोकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळी, पोलीस अंमलदार दत्तात्रय बनसोडे, सावन राठोड, ज्ञानेश्वर गाडेकर, भरत माने, दयानंद खेडकर, संदीप ठाकरे, श्यामसुंदर गुट्टे, गणेश मालुसरे, गोपाळ ब्रंह्मादे, यांनी केली आहे.

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप आयुक्त
मुख्यालय, पिंपरी चिंचवड